दैनिक www.ekarnala.com आपल्या कुटुंबाचं स्मार्ट दैनिक

# कर्नाळा

वर्ष ९ वे • अंक २५ • RNI No. 71245/1999 • NMB /127/2018-20 • रायगड • शुक्रवार, दि. १३ जुलै, २०१८ • पाने ६

## वसंतराव नाईक महाविद्यालयात अर्थशास्त्र असोसिएशनचे उद्घाटन

कर्नाळा : म्हसळा

बॅरिस्टर ए.आर.अंतुलेसाहेब यांनी स्थापन केलेल्या आणि कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित म्हसळा येथील वसंतराव नाईक कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र असोसिएशनचे उद्घाटन आणि लोकसंख्या दिन कार्यक्रम एकत्रितपणे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एस.एन. राघवराव हे होते तर प्रमुख पाहुण्या म्हणुन वाणिज्य महाविद्यालयातील व्यावसायिक अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्राध्यापिका निलिमा मिरजकर या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गिरीष समेळ यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयात अर्थशास्त्र असोसिएशनच्या स्थापनेबाबतचा उद्देश आणि त्या अंतर्गत राबविण्यात येणारे विविध उपक्रम यांची माहिती दिली.

व्यावसायिक अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. के.एम भोसले यांनी पाहुण्यांचा परिचय करुन देऊन लोकसंख्या दिन का साजरा केला जातो, याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्राध्यापिका निलिमा मिरजकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतातील लोकसंख्या वाढीचे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम व उपाययोजना सांगितल्या.

या कार्यक्रमास टि.वाय.बी.ए. आणि टि.वाय.बी. कॉम या वर्गातील बहुसंख्य विद्यार्थी आणि महाविद्यालयीन प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.